# फेरीवाल्यांनी हल्ला केला तर 'गुंडगिरी' ठरते पालिका व पोलिसांच्या 'हप्तेखोरीला' काय म्हणायचे?

संपादकीय

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

ठाण्याचे पालिका उपायुक्त संदीप माळवी यांनी फेरीवाला हटाव मोहीम सुरू केल्यावर शंभरहून अधिक फेरीवाले त्यांच्या अंगावर धावून गेले आणि त्यांना बेदम मारहाण केली. हा प्रकार अत्यंत अयोग्य आहे आणि असे प्रकार पुन्हा घडू नयेत याची कठोर व्यवस्था करायला हवी. यासाठी काय करायला हवे? हा हल्ला झाल्यानंतर २४ तासांत हल्ला करणाऱ्या फेरीवाल्यांपैकी तिघांना अटक केली. पण यामुळे समस्या संपत नाही तर उलट वाढत जाणार आहे. कारण हा प्रश्न ज्यांच्यामुळे निर्माण झाला त्या पालिका अधिकाऱ्यांवर आणि पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाईच होत नाही. फेरीवाले गुंडगिरी करतात असे म्हणून सर्वजण मोकळे झाले. पण पालिका आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या खाबुगिरीवर कुणी बोलत का नाही?

केवळ मुंबई, पुणे, ठाण्यातच नव्हे तर रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांची समस्या गावांपर्यंत पोचली आहे. फेरीवाल्यांमुळे चालायला त्रास होतो अशी ओरड करणारेच 'सोयीचे आहे' म्हणत घरी जाता येता याच फेरीवाल्यांकडून खरेदी करीत असतात. एकीकडे ही खरेदी सुरू असते आणि दुसरीकडे पालिका-पोलिसांचा दहा रुपयांचा रोजचा हप्ताही अखंड सुरू असतो. कुणाचाच विरोध नसल्याने नेत्यापासून अधिकाऱ्यांपर्यंत कुणीही फेरीवाल्यांच्या विरोधात बोलत नाही. परंतु जेव्हा एखादा सजग नागरिक न्यायालयात धाव घेतो, फूटपाथवरून चालण्याचे स्वातंत्र्य मागतो तेव्हा भ्रष्ट आचरणावर बसलेली ही घडी विस्कटते. दुर्दैव असे की, या भ्रष्ट कडीतील जो सर्वात गरीब असा फेरीवाला असतो त्याच्यावर सर्व बरसतात आणि खाऊन पिऊन फुगलेल्या अधिकाऱ्यांपासून नेत्यांपर्यंत सर्वजण स्वच्छ, सुसंस्कृत, सुशील असल्याचे मुखवटे चढवून वावरू लागतात. फेरीवाल्यांना अटक झाली की सजग नागरिकांना फार आनंद होतो. तोच सजग नागरिक अधिकाऱ्यांच्या अटकेची मागणी का करीत नाही? त्यांच्या अपराधाला सूट का मिळत नाही?

पालिकेची गाडी आली की, जीव घेऊन पळणारे फेरीवाले आपण सर्वांनी बघितले आहेत. ही जी पळापळ सुरू असते ती अधिकाऱ्यांच्या भीतीपोटी नसते. त्यांना तर प्रत्येक फेरीवाला हप्ता देत असतो. पण पालिकेला कारवाईचा देखावा करायचा असतो त्यासाठी फेरीवाले आपल्याला घाबरतात असे दृश्य जनतेपुढे निर्माण व्हावे लागते. यासाठी दोघांनी मिळून रचलेली ही नौटंकी सातत्याने सुरू असते. पालिकेची गाडी गेली की फेरीवाले परत येऊन बसतात. एखाद्या परिसरात एखादा सजग नागरिक जास्तच तक्रारी करीत असेल तर एकदोन दिवस फेरीवाल्यांना 'बसू नका' असे सांगितले जाते. त्यानंतर पुन्हा फूटपाथ फेरीवाल्यांनी भरतो. हे असे घडले की हप्त्याची रक्कम वाढते. आता तर आयुक्तांनी मुंबईत फर्मान काढले आहे की, प्रत्येक झोनमध्ये एक रस्ता फेरीवालामुक्त ठेवायचा. त्यामुळे प्रत्येक झोनमध्ये एक रस्ता फेरीवालामुक्त असतो आणि त्याच झोनमधील बाकी सर्व रस्ते फेरीवाल्यांनी ओसंडून वाहत असतात.

फेरीवाले माजलेत, त्यांची गुंडगिरी वाढलीय अशी वाक्य आपण ऐकतो. फेरीवाल्यांनी अधिकाऱ्यांवर, कर्मचाऱ्यांवर हल्ला केला तर आपल्याला मनस्वी राग येतो. ही भावना बरोबर आहे. पण फेरीवाले असे का वागतात? या फेरीवाल्यांचा धंदा हा रोजच्या कमाईचा असतो. धंदा झाला नाही तर बहुतेकांच्या घरी चूल पेटत नाही. मराठी आणि बिगर मराठी दोघांची हीच स्थिती आहे. त्यातच हे फेरीवाले त्यांच्या कष्टाच्या कमाईतून पालिका आणि पोलीस अधिकाऱ्यांना रोजचा हप्ता पोचवतात. एक दिवसही त्यांच्या हप्ता देण्यात खंड पडत नाही. मग हप्ता खाऊन कारवाईही केली तर तो फेरीवाला भडकणार नाही का? अधिकाऱ्यांवर हल्ले होतात ते यातूनच होतात.

यावर उपाय काय आहे? प्रत्येक शहरांत, गावांत फेरीवाला झोन निश्चित करायचा आणि त्या जागेत फेरीवाल्यांना लायसन्स देऊन बसवायचे असे धोरण आखले होते. हे फेरीवाला झोन तयार होऊन फेरीवाल्यांना तिकडे हलविले की, मग त्या झोनच्या बाहेर एकाही फेरीवाल्याला बसू देता कामा नये आणि जर एखादा बसलाच तर जशी फेरीवाल्याला अटक होते तशी त्या भागातील पालिका आणि पोलीस अधिकाऱ्यालाही अटक झाली पाहिजे. ही शिस्त पाळली तरच हा प्रश्न सुटेल. पण तोपर्यंत मर्जी येईल, तेव्हा फेरीवाल्यांवर कारवाई करायची हे प्रकार थांबले पाहिजेत. फेरीवाला पैशाने गरीब म्हणून त्याला वेठीस धरायचे आणि पैशानी भक्कम असलेल्या हप्ताखोर पालिका आणि पोलीस अधिकाऱ्यांना कणव दाखवायची हा न्याय नाही. न्याय हा सर्वांसाठी समान असायला हवा आणि कायद्याची अंमलबजावणी ही कायमस्वरूपी असायला हवी. आम्ही फेरीवाल्यांची बाजू घेतो अशी काहीजण ओरड सुरू करतील. त्यावर एकच उत्तर आहे. फेरीवाले आणि अधिकारी दोघेही कायदा मोडतात तेव्हा शिक्षा दोघांना झाली पाहिजे ही आमची मागणी आहे.